दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -९१ शनिवार,दि.०७ डिसेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-91 | Saturday, Dt.07 December 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री कोण होणार चर्चेला मिळाला पूर्णविराम !

## आता कॅबिनेट आणि राज्यमंत्री कोण होणार ? कोणत्या मंत्र्याला डिच्चू मिळणार ? चर्चेला आले उधान !!

बीड / वैभव स्वामी

**महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार ?राज्याचे उपमुख्यमंत्री पद कोण स्वीकारणार ? या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. महाराष्ट्राला पाच वर्षासाठी मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री मिळाले आहेत.त्यामुळे आता चर्चा सुरू झाली आहे ती महायुतीच्या मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट मंत्री आणि राज्यमंत्री कोण होणार ?कोणाला कोणते खाते मिळणार ?कोणत्या विद्यमान मंत्र्याला मंत्रिमंडळातून डिच्चू मिळणार ? या चर्चांनी मुंबई मंत्रालय ते गाव पातळीवरील गावकट्ट्यापर्यंत चर्चेला उधाण आले आहे. मंत्री कोण होणार ? कोणाला कोणते खाते मिळणार ? कोण मंत्री होऊ शकणार नाही ? कोणत्या विद्यमान मंत्र्याला मंत्रिमंडळातून डिच्चू मिळणार यावर देखील पैंजा लागू लागल्या आहेत.**


महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने नेत्रदीपक यश मिळवले. मिळालेले यश अफलातून असल्यामुळे या यशावर शंका कुशंकाने महाराष्ट्रासह देशभरात रान पेटले आहे. केंद्रातील भाजपा सरकारने हा निकाल ईव्हीएम मशीनच्या माध्यमातून घडवून आणला हा निकाल जनतेने दिलेला नाही. सत्ताधाऱ्यांनी सत्तेचा दुरुपयोग करत लोकशाहीचा गळा चिरला असा सूर विरोधकांसह ग्रामीण मतदारांमधून सुद्धा चर्चिला जात आहे. हे महाराष्ट्रासाठी आणि देशातील लोकशाहीसाठी हितावह नक्कीच नाही.मात्र लोकशाहीमध्ये जो निकाल लागला तोच अंतिम आहे हे सत्य नाकारून चालणार नाही. त्यामुळे महायुतीचा मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री निश्चित झाल्यानंतर मुंबईच्या आझाद मैदानावर न भूतो न भविष्यती असा नेत्रदीपक शपथ ग्रहण सोहळा संपन्न झाला. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीला देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी, देशाचे गृहमंत्री अमितभाई शहा यांच्यासह दिग्गज नेते, विविध राज्यातील मुख्यमंत्री, महाराष्ट्रासह देशातील उद्योगपती, सेलिब्रिटी अशी रेलचेल अनोखी होती. विशेष बाब म्हणजे मागील पंधरा दिवसापासून सुरू असलेला मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री कोण होणार ? त्यांचा शपथविधी कसा असणार ? या शपथविधी मध्ये देशाचे पंतप्रधान, देशाचे गृहमंत्री, विविध राज्याचे मुख्यमंत्री, महाराष्ट्राचे होणारे मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री काय बोलणार ? कोण कोण मंत्री शपथविधी घेणार ? अशा अनेक चर्चांचा काहूर माजलेला होता. मात्र अवघ्या पंधरा मिनिटांमध्ये शपथविधी सोहळा संपन्न झाला. या शपथविधी सोहळ्यामध्ये कोणीही काहीही बोलले नाही. त्यांच्या मौन असण्यामध्ये नेमक काय रहस्य आहे. हे महाराष्ट्राला अजूनही समजलं नाही. महाराष्ट्रामध्ये मंत्रिमंडळाचा विस्तार नसताना, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्याबरोबर मंत्रालयात जाऊन पहिली कॅबिनेट घेत प्रत्यक्ष कामकाजाला देखील सुरुवात केली आहे. सर्व काही अनोख या महाराष्ट्रामध्ये सुरू झाल आहे हे मात्र नक्की.आता उद्या आणि परवा दोन दिवसांमध्ये जे लोकनियुक्त आमदार म्हणून निवडून आलेले आहेत त्या आमदारांना विधिमंडळामध्ये अधिकृत शपथविधी सोहळा संपन्न होईल. यानंतर हिवाळी अधिवेशनापूर्वी म्हणजेच ११ डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळातील महायुतीचा मंत्रिमंडळ विस्तार होईल. या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये भारतीय जनता पार्टी, एकनाथराव शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून कोणत्या आमदारांना कॅबिनेट मंत्री म्हणून संधी मिळणार ? कोणाला राज्यमंत्री म्हणून संधी मिळणार ? कोणत्या विद्यमान मंत्र्यांना मंत्रिमंडळातून डिच्चू मिळणार ? यावर आता चर्चेला उधाण आले आहे. हे उधान एवढे उधळले आहे की मुंबईतल्या मंत्रालयापासून ते गाव गाड्यापर्यंत वस्त्यापर्यंत आता महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात हे कॅबिनेट मंत्री असतील ? हे राज्यमंत्री असतील ? या विद्यमान मंत्राला घरी बसवले जाईल ? यांना डिच्चू दिला जाईल ? यांना मंत्रिमंडळात घेतले जाणार नाही ? यावर बोली लागून पैंजा लागत आहेत.



### तर मंत्रिमंडळात सर्वाधिक मंत्री असलेला बीड जिल्हा ठरेल ?

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात धनंजय मुंडे हे मंत्री म्हणून फिक्स आहेत. तेवढीच ताकद लोकनेते पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वावर असल्यामुळे त्यांना देखील मंत्रिमंडळात संधी मिळण्याची शक्यता दाट आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील आमदार म्हणून सुरेश धस यांना संधी मिळू शकते. आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून सर्वात सीनियर म्हणून प्रकाश दादा सोळंके यांना देखील राज्यमंत्री म्हणून संधी मिळू शकते. जर असे झाले तर बीड जिल्ह्याला दोन कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्रीपद मिळतील.जर असे झाले तर महाराष्ट्रामध्ये एकाच जिल्ह्यातून सर्वाधिक मंत्री असलेला जिल्हा म्हणजे बीड जिल्हा असा नवा इतिहास निर्माण होवू शकेल. त्यामुळे बीड जिल्ह्याचे मंत्रिमंडळ विस्ताराकडे विशेष लक्ष वेधले आहे.

### आमदार प्रकाश सोळंके यांना संधी मिळेल का ?



माजलगाव विधानसभा मतदारसंघात पक्षांतर्गत, महायुती मधून, जरांगे समर्थकांमधून विरोध झालेला असताना सुद्धा प्रकाश दादा सोळंके यांनी माजलगाव मतदार संघावर ऐतिहासिक विजय मिळवला.या मतदारसंघात रमेश आडसकर हे जरांगेंचे उमेदवार म्हणून मराठा समाजात चर्चा होती तर भाजपा आणि महायुती समर्थकांमध्ये ते देवेंद्र फडणवीस यांचे उमेदवार आहेत अशी चर्चा होती. नव्हे फडणवीसांच्या अनेक खंद्या समर्थकांनी त्यांचा जाहीर प्रचार करून निवडणुकीत दादांना शह दिला होता.तरीदेखील दादा विजयी झाले. अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये बीड जिल्ह्यातील ते सर्वात सीनियर आणि सर्वाधिक वेळा निवडून आलेले आमदार असल्यामुळे त्यांना अजित दादा हे धनंजय मुंडे यांच्या मर्जीत असेल तर राज्यमंत्री म्हणून संधी देऊ शकतील. तशी दादांना मंत्रिमंडळात संधी मिळेल अशी शक्यता कमीच आहे. पण जर मिळालीच तर ही संधी बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी मधून धनंजय मुंडे यांच्यानंतर दादांनाच मिळू शकते.

### पंकजा मुंडे यांना संधी मिळणार का ?



महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय नेत्या लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकीय वारसदार कन्या लोकनेत्या पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून संधी मिळेल का ? बीड जिल्ह्यातूनच एका विद्यमान भाजपाच्या आमदाराने निवडून येताच पंकजा मुंडे यांच्या पक्षनिष्ठेबद्दल थेट आरोप केलेला आहे. तर दुसरे गेवराईतील भाजपाचे बंडखोर अपक्ष उमेदवार लक्ष्मण आण्णा पवार हे देखील ताईंच्या परस्पर थेट फडणवीस यांच्या संपर्कात राहून भारतीय जनता पार्टीमध्ये सक्रिय झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्या जिल्ह्यातच फडणवीसांनी ताईंना पक्षांतर्गत सुरुंग लावलेले उघड होत असताना त्यांना मंत्रिमंडळामध्ये संधी मिळेल का ? यावर तर्कवितर्क होत आहेत. मात्र ताईंना संधी देऊन त्यांचा आणि त्यांच्या समर्थकांचा पाच वर्ष नाहक विरोध नको म्हणून एखाद साईड खातं त्यांना देऊन विषय संपवावा असंही होवून त्यांना मंत्रिपदाची संधी दिली जाऊ शकते. जर मंत्रीपद मिळालं तर ते लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांची कन्या म्हणूनच त्यांचं व्यक्तिगत कर्तुत्व म्हणून मिळणार नाही अशीही चर्चा होत आहे.



### बीड जिल्ह्यातून धनंजय मुंडे एकमेव फिक्स कॅबिनेट मंत्री ?

महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक विक्रमी मतांनी विजयी होणारे परळी मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे अत्यंत विश्वासू आणि लाडके आमदार म्हणून ज्यांची ओळख आहे ते बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र बीड जिल्ह्याची शान धनंजय मुंडे होय. ते मंत्रिमंडळामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पहिल्या पाच मंत्र्यांच्या यादीमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून आणि बीड जिल्ह्याचे भावी पालकमंत्री म्हणून फिक्स आहेत. यात तीळमात्र शंका नाही.

### आ. सुरेश धस यांना राज्यमंत्रीपदाची संधी मिळणार ?

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघात सर्वांनाच आसमान दाखवत अनेकांच्या नाकावर टिच्चून आमदार झालेले सुरेश धस यांनी अंगावर गुलाल पडताच थेट बीड जिल्ह्यातील भाजपाच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या पक्षनिष्ठेवरच आक्षेप घेत ताई तुम्ही असं करायला नको होतं, असं वक्तव्य करून राज्यात खळबळ उडून दिली होती. असा थेट आरोप करायला देखील मोठ धाडस आणि काळीज लागतं. आमदार सुरेश धस यांनी देखील आता पंकजाताई मुंडे या आपल्या नेत्या नाहीत तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच आपले नेते आहेत हे विजयानंतर वारंवार सिद्ध करण्यास सुरुवात केली आहे. ते आमदार होण्यापूर्वी देखील देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत जवळचे आहेत हे लोकसभा निवडणुकीत फडणवीस यांनी जामखेडच्या सभेत आष्टी मतदारसंघातून सुरेश धस हे उमेदवार राहतील असे जाहीर करून स्पष्ट केलेले होते. त्याचबरोबर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच आष्टी मध्ये कधी नव्हे ते पहिल्यांदा पंकजा मुंडे यांचे फोटो न घेता फक्त देवेंद्र फडणवीस यांचे फोटो बॅनर वर झळकावत त्यांच्या नावाचा जयघोष करत अख्या आष्टी मतदारसंघांमध्ये गुलालाची उधळण आणि जागोजाग फटाक्यांची आतिषबाजी करत दस यांच्या समर्थकांनी अक्षरश दिवाळी साजरी केली.त्यामुळे देवेंद्र फडणवीस बीड जिल्ह्यात पंकजा मुंडे यांना शह देण्यासाठी आपला एक प्यादा म्हणून सुरेश धस या निष्ठावंत आमदाराला राज्यमंत्री म्हणून संधी देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांना संधी देऊन परभणीचे पालकत्व देखील देण्याची शक्यता आहे.



## मोबाईलचा स्फोट होऊन शिक्षकाचा मृत्यू, शेजारी असलेला व्यक्ती सुद्धा जखमी

खिशात ठेवलेल्या मोबाईलचा अचानक स्फोट झाल्यानं त्यात गंभीर जखमी होऊन शिक्षकाचा मृत्यू झाला. तर त्याच्यासोबत असलेला नातेवाईक गंभीर जखमी झाल्याची घटना गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगाव बांध इथं सायंकाळी सात वाजताच्या सुमारास घडली. सुरेश संग्रामे (वय ५५) असं मृतक शिक्षकाचं नाव आहे. तर नत्थु गायकवाड (५६) असं गंभीर जखमी असलेल्या इसमाचं नाव आहे. मृतक सुरेश संग्रामे आणि गंभीर जखमी नत्थु गायकवाड हे नातेवाईक असून दोघेही भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील सिरेगावटोला येथील रहिवासी आहेत. दोघेही नातेवाईकाच्या एका कार्यक्रमासाठी अर्जुनी मोरगावकडं निघाले असताना ही घटना घडली. गंभीर जखमी नत्थु गायकवाड यांच्यावर सध्या भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मोबाईलचा स्फोट होऊ नये यासाठी कोणती काळजी घ्याल?

मोबाईलचा स्फोट होऊ नागरिकांचा जीव जाणे किंवा जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. बहुसंख्यजण मोबाईल वापरताना काही चूका करत असतात. कंपनीने म्हणजेच प्रोप्रायटरने उपलब्ध करुन दिलेल्या चार्जरशिवाय मोबाईल चार्ज करणं धोकादायक असू शकतं. मोबाईल एका कंपनीचा आणि त्याला चार्जर तिसराच वापरणे, हे देखील धोकायदायक ठरु शकते.

दैनंदिन जीवनात स्मार्टफोनचा वापर जीवघेणा ठरु शकतो. हे प्रकर्षाने समोर येऊ लागले आहेत. मोबाईलचा स्फोट होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरु शकतात? मोबाईलचा स्फोट होऊ नये, यासाठी कोणती काळजी घ्यायला हवी? याबाबत जाणून घेऊयात..

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय

# आव्हाने आणि आसही!

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ घेण्यासाठी महायुतीतील घटकपक्षांनी प्रचारकाळात खेळलेल्या खेळ्या लक्षात घेतल्या तरी संभाव्य श्रेयवाद किती उग्र राहू शकेल याची चुणूक दिसून येतेदेवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस' यांनी गुरुवारी अखेर आपला शब्द खरा करून दाखविला. राज्याचे एकविसावे मुख्यमंत्री म्हणून ते सत्तास्थानी आरुढ झाले आहेत. त्यांच्यासोबतच, एकनाथ गंगूबाई संभाजी शिंदे आणि अजित आशाताई अनंतराव पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीचा भव्य, देदीप्यमान सोहळा राज्याने अनुभवला.

या वलयांकित उत्सवामुळे यापूर्वीचे विलंबित सूर विरले असावेत असे 'सध्या'चे चित्र आहे. या समारंभाआधी अनेक गणिते जुळून आणावी लागली. या शपथविधीने काही राजकीय ताळेबंद बिघडण्याचीही शक्यता आहे. राजकारणात सर्वच गोष्टी त्वरेने होतात असे नाही. काही गोष्टींची चर्चा दीर्घकाळ होत राहते. दु:खी आत्म्यांचे असे रेंगाळते रवंथ आटोक्यात आणून अनेक आव्हानांचा सामना करीत राज्याचा 'महाविकास' घडविण्याचे कौशल्यकाम नव्या सरकारला करावे लागणार आहे.

मागच्या विधानसभेत बहुमताने निवडून आलेल्या सरकारमधील एक घटकपक्ष ऐन वेळी रुसला आणि त्याने वेगळी चूल मांडली. त्या घडामोडींनी देवेंद्र फडणवीस यांच्या राज्य नेतृत्वाचा घास पळविला होता. वरिष्ठांच्या निर्देशांनंतर त्यांना 'उप'नेतेपद स्वीकारावे लागले. नाराजीचे नाट्य या वेळीही झाले, मात्र एकनाथ शिंदे यांनी या अप्रसन्नतेचा प्रसार समर्थकांमधील रुष्टतेत परावर्तित होऊ नये, याची काळजी घेतली. यासाठी दोन वेळा माध्यमांपुढे येऊन खुलासा करण्याचे भान त्यांनी ठेवले. आजवर काहीसे ठाण्यापुरते केंद्रित झालेल्या एकनाथ शिंदे यांचा राजकीय परीघ मागील अडीच वर्षांत राज्यपातळीवर पोहोचला. ही राजकीय सक्षमता सिद्ध करताना त्यांनी 'साम-दाम-दंड-भेद' यापैकी कोणतेही मार्ग निषिद्ध ठेवले नाहीत. त्यांचे हे प्राबल्य आजवर कौतुकाचा विषय ठरले असले तरी, पुढील काळात काटेरी कंगोरे राज्याच्या नेतृत्वाला जाचक ठरणार नाहीत, याची काळजी भाजपला घ्यावी लागेल.

लोकप्रियतेचा जो परीघ शिंदे यांनी कमावला, त्याला उतरती कळा लागू नये, याचे प्रयत्न त्यांच्या पक्षाकडून आणि समर्थकांकडून नेटाने केले जातील. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ घेण्यासाठी महायुतीतील घटकपक्षांनी प्रचारकाळात खेळलेल्या खेळ्या लक्षात घेतल्या तरी संभाव्य श्रेयवाद किती उग्र राहू शकेल याची चुणूक दिसून येते. मुख्यमंत्री देवेंद्र यांच्यासोबत उपमुख्यमंत्रिपद स्वीकारताना अजित पवार हे उत्साहित होते. ते सहाव्यांदा उपमुख्यमंत्री झाले आहेत. ते आणि एकनाथ शिंदे हे सारख्या पदावर असले तरी त्यांची वृत्ती समान असेल हे समजण्याची गल्लत भाजपला करता येणार नाही. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी एक पाऊल मागे घेतले आहे. अजित पवार यांचा आटापिटा एक पाऊल पुढे जाण्यासाठी सुरू आहे. त्यामुळेच सत्तेतील त्रिदेवांचा ताळमेळ गरजेचा असणार आहे. विरोधकांचे सभागृहातील संख्याबळ कमी झाले असल्याने मतदारांपुढे जाऊन आंदोलने करण्याचे सातत्य त्यांना टिकवावे लागेल.

# शिरूर येथे दहा डिसेंबर रोजी हिंदू न्याय यात्रेचे आयोजन

## बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अन्यायाविरोधात रॅली निघणार

मानूर ।प्रतिनिधी

बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी १० डिसेंबर रोजी शहरात हिंदू न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.दुपारी एक ते तीन या वेळेत शहरातील गांधी चौक ते जिजामाता चौक दरम्यान हिंदू न्याय यात्रा संपन्न होणार आहे.त्या नंतर तहसील कार्यालयात जाऊन तहसीलदार यांना निवेदन देखील देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.जागतिक मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून जागतिक मानवाधिकार परिषदने हिंदूवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची कधीच दखल घेतलेली नाही.बांग्लादेशात हिंदुवर आणि अन्य अल्पसंख्य समुदायावर अनन्वित अत्याचार होत आहे.संयुक्त राष्ट्र आणि मानवाधिकार परिषद याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे.बांग्लादेशात हिंदू संत,मंदिर,हिंदू संस्था असुरक्षित असून दररोज हल्ले होत आहे.भारत सरकार जागतिक पातळीवर बांगलादेशी हिंदूच्या रक्षणासाठी प्रयत्न करत आहे.त्याला हिंदूंच्या दबावामुळे यश येईल.हिंदू समाजबांधव आज जगातील शंभरपेक्षा अधिक देशात कमी अधिक प्रमाणात वास्तव्य करत आहेत त्यांना शांतीपूर्वक जगण्याचा अधिकार आहे.हिंदू बांधवांवर जगात कुठेही अन्याय झाला तर त्याचा हिंदू समाजाकडून तीव्र निषेध आणि विरोध होईल हा संदेश पूर्ण जगात जाणे आवश्यक आहे.हिंदू समाज भारतात बहुसंख्य असला तरी जागतिक पातळीवर आपण अल्पसंख्य आहोत त्यामुळे संयुक्त राष्ट्राने गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील आपल्या बांधवांना वाचवण्यासाठी प्रत्येक गावात,शहरात, तालुक्यात आंदोलन सुरू असून शिरूर शहरात देखील आंदोलन करण्यात येणार आहे.हिंदू समाज यापुढे कोणताही अन्याय, अत्याचार सहन करणार नसून बांगलादेशी हिंदू बांधवांसाठी एक होणे गरजेचे असून हिंदूंना न्याय मिळालाच पाहिजे अशी भावना आयोजकांची आहे.



देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच

## मा.आ.लक्ष्मण पवारांच्या भाजप कार्यालयात जल्लोष

गेवराई ।प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपा महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे त्यामुळे भाजपाचे विधीमंडळ गटनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती तेव्हाच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच होणार जवळपास निश्चित झाले होते त्या.अनुषंगाने आज दि ५ डिसेंबर रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे यांना पद व गोपनीयतीची शपथ दिली याप्रसंगी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी, यांच्या अनेक राज्याचे मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्रिमंडळाती मंत्री उपस्थित होते महायुती सरकारच्या शपथ विधीचा लाईव्ह कार्यक्रमाचे आ.लक्ष्मण पवारांच्या संपर्क कार्यालयात आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथग्रहण सुरु असतांना गेवराई भाजपा कार्यालयात पेढे वाटून फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला होता यावेळी नागरिकांसह पदाधिकाऱ्यांसह कार्यक्रत्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती

# अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन सरसकट भरपाई द्या

## आ.संदीप क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी

बीड ।प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रासह बीड जिल्ह्यात शुक्रवारी (दि.६) रोजी सकाळपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. या अवकाळी पावसाने शेती पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आणि होत आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई देण्यासाठी कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



शुक्रवारी (दि.६) रोजी सकाळपासूनच बीड मतदारसंघातील बीड आणि शिरूर का. तालुक्यासह बीड जिल्ह्यात अवकाळी पाऊस होत आहे. या पावसाने शेतीपिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आहे तसेच होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने अवकाळी पाऊस हे कारण नियमोचीत दाखवून झालेल्या नुकसानीची तक्रार क्रॉप इन्शुरन्स पवर करण्यासाठी तलाठी व संबंधित यंत्रणेच्या मार्फत शेतकर्यांना कळवावे. तसेच प्रशासनाने घटनास्थळी जाऊन पंचनामे करावेत आणि शेतकरी बांधवांना सरसकट नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक व तहसिलदार बीड आणि शिरूर का. यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

# शिर्डी येथे रविवारी महा - ई - सेवा आधार केन्द्र अधिवेशन

मानूर ।प्रतिनिधी


महा ई सेवा आधार केंद्र चे पहिले अधिवेशन शिर्डी येथे रविवारी ८ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे.. या राज्यस्तरीय अधिवेशनात महा ई सेवा केंद्र संचालक यांच्या अडचणी. काम करताना येणाऱ्या समस्या या बाबत चर्चा करून नवीन संघटना बांधणी बाबत विचार विनिमय होणारं आहे. जिल्ह्यातील सर्व महा ई सेवा केंद्र संचालक यांनी या अधिवेशनात सहभागी व्हावे. असे आवाहन राज्य कार्यकारिणी आणि जिल्हा अध्यक्ष प्रविनजी मुंढे यांनी केले आहे.राज्यशासनाने महसूल संबंधित विविध प्रकारच्या सुविधा जनतेला मिळाव्या या साठी आधार व सेतू केन्द्र सुरू केले आहेत.मात्र आधार केंद्र आणि सेतू सुविधा केंद्र संचालक यांच्या अनेक अडचणी आहेत.त्या विषयी



चर्चा करून सरकार कडे मागण्याचे निवेदन सादर करायचे आहे. म्हणून या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील सर्व महा ई सेवा केंद्र संचालक यांनी या अधिवेशनात सहभागी व्हावे.असे आवाहन केंद्र संचालक अशोक विघ्ने यांनी केले आहे.



बीड - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.यावेळी उपस्थित शिवसेनेचे तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, युवानेते विनोद गूंड पाटील, युवानेते अजय गायकवाड सह सर्व उपस्थित होते.



**बीड - शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचे युवा सहकारी आदित्य सातपुते यांची बीड जिल्हा न्यायालय येथे लिपिक पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.यावेळी उपस्थित श्रीराम फायनान्स चे मॅनेजर राम सातपुते सर, गोरख भटे, अजय सातपुते,अनिल सातपुते..**

# आदित्य महाविद्यालयाचे विद्यार्थी जिल्ह्यातली सर्व शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची दंत तपासणी करणार

## पहिल्याच दिवशी ४८५ विद्यार्थ्यांची तपासणी, ५६ विद्यार्थ्यांवर पीट अँड सिलेंट उपचार

बीड ।प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेत मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आणि उज्वल भावी आयुष्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. आता आदित्य दंत महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यामाने नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम अंतर्गत पिट अँड फिशर सिलेंट प्रोग्राम जिल्हाभर राबवला जाणार असून आठवड्यातील दोन दिवस आदित्य दंत महाविद्यालयाचे विद्यार्थी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची तपासणी करत त्यांच्यावर उपचारही करणार आहेत. गुरूवारी याचा शुभारंभ जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालीका डॉ. आदिती सारडा यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालय बीड येथे झाला. यावेळी पहिल्याच दिवशी ४८५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यामधील ५६ विद्यार्थ्यांवर पीट अँड सिलेंट उपचार विद्यार्थ्यांनी तत्काळ केले.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये दंत समस्या मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. या संदर्भात जिल्हा




शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम आदित्य दंत महाविद्यालयाच्या सहकार्याने जिल्ह्यात राबवण्याचा संकल्प केला आहे. याची सुरूवात गुरूवारी झाली. आदित्य महाविद्यालयाच्या वतीने आठवड्यातून दोनदा जिल्ह्यातील शाळेत जाऊन त्या ठिकाणी विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून कॅरीज फ्री बीड बनवण्याचा संकल्प डॉ.अदितीजी सारडा व डॉ. अशोक जी थोरात यांनी या केला. कार्यक्रमात शाळेच्या वतीने चौधरी सर व आदित्य दंत महाविद्यालयाच्या वतीने डॉ, हिमांशुजी श्रीवास्तव, डॉ. मंगेश अंधारे यांनी व जिल्हा रुग्णालयाच्या वतीने डॉ. सत्येंद्र दबाडगावकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. आभार राम गायकवाड मानले.

### बीड जिल्ह्यासाठी सदैव तत्पर राहील-डॉ.अशोक थोरात

नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम च्या अंतर्गत येणाऱ्या पिट अँड फिशर सिलेंट प्रोग्राम या कार्यक्रमांतर्गत बीड जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये जाऊन फक्त तपासणीच न करता त्या ठिकाणी उपचार पद्धती सुद्धा उपलब्ध करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. प्रत्यक्ष शाळेत जाऊन त्या ठिकाणी पीठ आणि फिशर सिलेंट चे उपचार पद्धती करण्यात येणार आहेत.यासाठी आदित्य महाविद्यालयाचा मोठे सहकार्य आम्हाला मिळणार आहे.

-डॉ.अशोक थोरात, जिल्हा शल्यचिकित्सक, बीड

### शासनाने टाकलेल्या विश्वासावर कधीही तडा जाऊ देणार नाही - डॉ. अदिती सारडा

आदित्य शिक्षण संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या हितासाठी महाविद्यालयात उपक्रम राबवत आहे. शासनाने नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम च्या अंतर्गत आदित्य दंत महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयाच्या वतीने राबवण्यात येणारा पिट अँड फिशर सिलेंट प्रोग्राम अतिशय संपूर्ण जिल्ह्यातील शाळेत राबवला जाईल. शासनाने टाकलेल्या विश्वासावर कधीही तडा जाऊ देणार नाही-

-डॉ. आदिती सारडा, संचालिका आदित्य शिक्षण संस्था, बीड




**लातूर ।प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात उपप्राचार्य कविता केंद्रे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, राजेंद्र जायेभाये, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक अश्विनी केंद्रे, राजीव मुंढे, वैशाली केंद्रे, राणी केंद्रे, पर्यवेक्षक सुनीता जवळे, मदन धुमाळ यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य कविता केंद्रे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.**

# एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी आवाहन

बीड ।प्रतिनिधी

इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित स्पर्धा परीक्षा होणार आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. सदर अर्ज २५ जानेवारी, २०२५ पर्यंत संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकांमार्फत सादर करावेत, असे आवाहन छत्रपती संभाजी नगरच्या आदिवासी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी केले आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद, कळमनुरी यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १२ जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व शासन मान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित, आदिम जमातीचे विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेसाठी पात्र राहातील. नमूद सर्व शाळेतील मुख्याध्यापक यांनी प्रवेश परीक्षेचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे मुदतीत सादर करावेत, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# के.एस.पी विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन उत्साहात संपन्न



बीड ।प्रतिनिधी

दि.६ डिसेंबर रोजी शहरातील कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय के.एस.पी विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन उत्साहात संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके यांनी मुलांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना बौद्ध ग्रंथांमधील महापरिनिर्वाण म्हणजे मृत्यूनंतरची मुक्ती, जन्म आणि मृत्यूच्या चक्रातून मुक्तीचे प्रतीक आहे. डॉ. आंबेडकरांची विचारधारा बौद्ध धर्माशी मिळतीजुळती आहे आणि त्यांचे अनुयायी त्यांना बौद्ध गुरू मानतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन म्हणजे संघर्ष, कर्तृत्व आणि यशाचा उत्तुंग प्रवास आहे. बाबासाहेबांनी सामाजिक भेदभाव आणि जातिव्यवस्थेचा प्रतिकार करत शिक्षणाच्या बळावर आपले स्थान निर्माण केले. हे फक्त भारताच्या संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, आणि मानवतावादी विचारवंत होते. त्यांनी समाजाच्या तळागाळातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर झगडले. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयी व महापरिनिर्वाण दिना बदल माहिती सांगण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच कार्यक्रमाचे मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरी करण्यात आला.



**बीड - महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील पेठ बीड भागातील पूर्णाकृती पुतळ्यास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी नगरसेवक गणेश वाघमारे, अशोक वाघमारे, जयश्रीताई विधाते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्ष संगीताताई वाघमारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# अंबडला तीन दिवस रंगणार शतकपूर्ती दत्त जयंती संगीतोत्सव

## देशातील नामवंत कलावंतांचा सहभाग होणार

अंबड ।प्रतिनिधी

स्व.श्री त्रिंबकराव जळगांवकर यांनी सुरू केलेला आणि गायनाचार्य पंडित गोविंदराव जळगांवकर यांनी स्वरसातत्याने जोपासलेला शतकपूर्ती दत्त जयंती संगीत महोत्सव येत्या दि.१३, १४ आणि १५ असा तीन दिवस आणि पाच सत्रात संपन्न होणार आहे. अंबड नगरपरिषदेच्या गायनाचार्य पंडित गोविंदराव जळगांवकर नाट्यगृह येथे या संगीतोत्सवाचे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती मुख्य संयोजक अरविंद जळगांवकर यांनी दिली आहे. रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गायन,वादन, नृत्यकलेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. अंबड येथे शतक महोत्सवी संगीतोत्सवाचा प्रारंभ दि १३ डिसेंबर शुक्रवार रोजी सायंकाळी ६.३० वाजता नांदी गायनाने होणार असून यानंतर उद्घाटन समारंभ होईल. श्री शिवम तोडकर ( छत्रपती संभाजीनगर ) यांच्या शहनाई वादनाने पहिल्या शुभरंभाच्या सत्राचा प्रारंभ होईल,त्यानंतर श्री.नागेश आडगावकर (पुणे )यांचे गायन, श्री .यशवंत वैष्णव (मुंबई) यांचे एकल तबलावादन , सुश्री पार्वती दत्ता (छत्रपती संभाजीनगर ) यांचे कथ्थक नृत्य, पं. रोनू मुजुमदार (मुंबई )यांचे बासरीवादन आणि पं. उल्हास कशाळकर ( मुंबई ) यांच्या गायनाने या सत्राचे समापन होईल.दुसरे सत्र शनिवार दि १४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी नऊ वाजता नांदी गायनाने सुरू होईल त्यांना श्री शंकर गिरी ( अंबड )यांचे गायन, श्री नितीश पुरोहित (पुणे)यांचे सरोद वादन , डॉ.वैशाली देशमुख ( छत्रपती संभाजीनगर) यांचे गायन,आणि श्री.कुमार मर्डुर (धारवाड) यांच्या



**पं. उल्हास कशाळकर**

गायनाने हे सत्र संपन्न होईल.

तिसरे सत्र १४ डिसेंबर २०२४ शनिवारी सायंकाळी ६.३० वाजता नांदीने सुरू होईल,त्यानंतर आसावरी देगलूरकर-देसाई (पुणे ) यांचे गायन, श्री ईश्वर घोरपडे ( पुणे ) यांचे गायन, श्री .शांतीभूषण देशपांडे (छत्रपती संभाजीनगर), यांचे एकल हार्मोनियम वादन, पं.राजेंद्र कुलकर्णी आणि पं. प्रमोद गायकवाड (पुणे) यांचे बासरी आणि शहनाई सहवादन आणि पं. राम देशपांडे ( मुंबई ) यांच्या गायनाने या सत्राचे समापन होईल. चौथे सत्र रविवार दि १५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता नांदी गायनाने सुरू होईल,त्यानंतर श्री.दिनेश संन्यासी (जालना ), यांचे गायन,श्री.सचिन नेवपुरकर (छत्रपती संभाजीनगर ), यांचे गायन,श्री.अभिषेक काळे (सांगली) यांचे गायन,पं. सुनील कुलकर्णी (दिल्ली) यांचे गायन श्री. पंकज विशाल (दिल्ली) यांचे सतार वादन होईल,या सत्राचे समापन विदुषी कलापिनी कोमकली (देवास ) यांच्या गायनाने होईल.

पाचवे सत्र रविवार दि १५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजता नांदी गायनाने सुरू होईल त्यानंतर श्री. विक्रांतजी वायकोस ,कलाश्री अकादमी शिष्यगण (छत्रपती संभाजीनगर ) यांचे भरत नाट्यम, श्री.रितेश आणि श्री.रजनीश मिश्रा (बनारस ) यांचे सहगायन , श्री. फारुक लतीफ (मुंबई) यांचे सारंगी वादन , पं.विश्वनाथ दाशरथे (छत्रपती संभाजीनगर ) यांचे गायन, विदुषी मंजुषा कुलकर्णी-पाटील ( पुणे ) यांचे गायन, पं. जयतीर्थ मेवूंडी (धारवाड) यांचे गायन आणि पं. राजा काळे ( मुंबई ) यांच्या गायनाने या शेवटच्या सत्राचा समारोप होईल. सर्व गायक,वादक आणि नृत्य कलावंतांना तबल्यावर पं. अरविंदकुमार आझाद, पं. मुकेश जाधव ,श्री. ईशांत परांजपे ,श्री. दुर्जय भौमिक, श्री. प्रशांत गाजरे, श्री. धनंजय जळगावकर, श्री.अनिरुद्ध देशपांडे ,श्री जगमित्र लिंगाडे ,श्री .प्रसन्न देशपांडे ,श्री.कृष्णा चौधरी हे साथ संगत करणार आहेत तर हार्मोनियमवर श्री. सुयोग कुंडलकर, श्री .लीलाधर चक्रदेव, श्री. शांतीभूषण देशपांडे ,श्री. केदार देशमुख, श्री .मंगेश जवळेकर, श्री.यश खडके हे साथ संगत करणार आहेत तर पखवाजवर श्री.विश्वेश्वर जोशी यांची साथ असेल.या पाचही सत्राचा लाभ घेण्याचे आवाहन श्री अरविंद जळगावकर यांनी समर्थ सांस्कृतिक मंडळ आणि देवगिरी संगीत प्रतिष्ठानच्या वतीने केले आहे.

# आता वक्फ बोर्डाच्या जमीनींचा विविध विकास कामासाठी उपयोग करता येणार

## अध्यक्ष समीर काजी यांनी जाहीर केला धोरणात्मक निर्णय



छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र वक्फ बोर्डाच्या राज्यातील शेकडो एकर जमिनींचा उपयोग आता विविध विकास कामासाठी उपयोग करण्यात यावा या साठी बोर्डाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे.जमिनींचा उपयोग शैक्षणिक व आरोग्य सेवा देण्या साठी व्हावा,हा त्या मागचा हेतू असेल,अशी महत्वपूर्ण माहिती बोर्डाचे अध्यक्ष समीर काजी यांनी दिली.पुण्याच्या आजम कॅम्पस येथील एमसीईएस या सनामवंत संस्थे तर्फे आयोजित वक्फ संपत्ती आणि उपयोग या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा अयोजित करण्यात आली होती,या वेळी ते बोलत होते.

वक्फ बोर्डाचा उद्देश हा मुळात समाजासाठी कल्याणकारी योजना राबवून त्यांचे बळकटीकरण करण्याचा आहे.त्या साठी मागच्या काही वर्षांत हे काम पूर्णपणे करण्यात आले नाही.मात्र आता जमिनींचा उपयोग योग्य रीतीने केल्यास त्याचा फायदा निश्चितपणे समाजाला होईल,असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला.जमिनीचा विकास करण्यासाठी आम्ही वेळोवेळी शैक्षणिक व आरोग्यसेवा राबविणाऱ्या संस्थांना आवाहन करत आहोत,अनेक संस्थांनी सकारात्मक प्रस्ताव दाखल केले आहे.राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ही योजना राबविण्याचा आमचा उद्देश आहे.त्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.राज्यभरात जनजागृती करून ही योजना राबविण्यात येणार आहे.कार्यशाळेच्या समारोप नंतर पुणे विभागातील संस्थांच्या अनेक पदाधिकारी व सदस्यांनी भेट घेत निवेदने दिली व आपल्या अडचणी मांडल्या.या वेळी समीर काजी यांनी सर्वांशी चर्चा करून त्यांच्या संस्थांच्या अडचणी एकूण घेतल्या व लवकरच दूर करण्यात येईल, असे आश्वासन दिलं.तसेच संबंधीत वक्फ अधिकाऱ्यांना बोलून अडचणी दूर करण्याचे निर्देश दिले.कार्यशाळेत वक्फच्या विविध विषयावर पाटणा येथील चाणक्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.फैजान मुस्तफा,दिल्ली येथील ऑल इंडिया जकात फौंडेशनचे अध्यक्ष डॉ.जफर महमूद,एमसीईएस संस्थेचे अध्यक्ष पी.ए. इनामदार, उपाध्यक्ष आबेदा इनामदार,वक्फ टास्क फोर्सचे अध्यक्ष सलीम मुल्ला व सल्लागार अक्रमुल जब्बार या वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

### 1 तो निधी फक्त बळकटीकरणसाठीच

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभागा कडून नुकतेच वक्फ बोर्डाला दिलेला दहा कोटी निधीचा अध्यादेश रद्द केला.या वर समीर काजी यांनी सांगितले की,वक्फ जनतेच्या सेवे साठी काम करणारी स्वायत्त संस्था आहे.संस्थेस शासना कडून कर्मचाऱ्यांना पगारसाठी पैसा दिला जात नाही,मात्र समाजाची सेवा देण्याची यंत्रणा सक्षमपणे अधिक बळकट व्हावी,या साठी इतर महामंडळांच्या धर्तीवर निधी देण्यात आला होता.महाराष्ट्रात कोणाचीही सत्ता असो,त्यांनी समाजासाठी या कार्यात नेहमी सकारात्मक सहभाग घेतला आहे.या पुढेही शासन सकारत्मक सहकार्य करेल,अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### 2 नोंदणीचा मिशन जीरो पेंडंसी उपक्रम राबविणार

मी बोर्डाचा अध्यक्ष झाल्या पासून गेल्या वर्षभरात अनेक उपक्रमावर काम केले आहे.फक्त २३ कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर चालणारा राज्याचा कारभार सुधारण्यासाठी साठ नियमित कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे.जिल्ह्यांची यंत्रणा सक्षम झाल्या मुळे आता संस्थांच्या नोंदणीसाठी मिशन जीरो पेंडंसी संकल्पना राबविण्यात येणार आहे.त्यामुळे राज्यातील सर्व संस्था नोंदणीकृत होणार आहे.


### 3 मुख्यकार्यालयात हेल्प डेस्क

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वक्फ कार्यालय उघडण्यात आले आहे.संबंधित लोकांना मुख्य कार्यालयात चकरा मारण्यात येऊ नये म्हणून कोणतेही प्रस्ताव त्याच जिल्हा कार्यलयात स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.लोकांचा पैसा व वेळ वाचावा, त्या मागचा हेतू असून यात आम्ही यशस्वी झालो.तसेच संबंधितांची अडचण दूर करण्यासाठी आम्ही लवकरच मुख्य कार्यलयात हेल्प डेस्कची सुरुवात करणार आहोत.शासनाच्या एक खिडकी योजनेच्या धर्तीवर लोकांच्या अडचणीवर मात करण्यासाठी ही संकल्पना ही महत्त्वाची ठरणार आहे.आधुनिक तंत्रज्ञानाची जोड निर्माण करून लोकांना तात्काळ दिलासा देण्यासाठी वक्फ यंत्रणा सक्षम करण्यावर आमचा भर असणार आहे.

# आरोग्यवर्धिनी योग शिक्षक संघटनेच्या राज्य सदस्यपदी प्रा. राजेंद्र बरकसे यांची नियुक्ती

गेवराई ।प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून पतंजली योग समिती व महाराष्ट्र योग शिक्षक संघ यांच्या माध्यमातून आरोग्यविषयक उपक्रम राबविणारे ज्येष्ठ योग शिक्षक प्रा. राजेंद्र बरकसे यांची महाराष्ट्र योग शिक्षक संघ अंतर्गत राज्य आरोग्यवर्धिनी योग शिक्षक संघटनेच्या राज्य कार्यकारिणी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आल्याची माहिती राज्य अध्यक्ष गजानन चौधरी यांनी पत्रान्वये दिली आहे. नुकतेच महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे चौथे राज्य संमेलन श्री क्षेत्र आळंदी येथे संपन्न झाले. राज्य समितीच्या बैठकीत निश्चित केल्याप्रमाणे महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या बीड जिल्हा सोशल मीडिया प्रभारी प्रा. राजेंद्र बरकसे यांची राज्य आरोग्यवर्धिनी योगशिक्षक संघटनेच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे.या राज्य संघटनेच्या सदस्य पदी नियुक्ती केल्यानंतर योगाचे हे महान कार्य आपण आपल्या संपूर्ण जबाबदारीने पार पाडालाच याविषयी विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. ही नियुक्ती ३ डिसेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२६ अशी दोन वर्षासाठी करण्यात आली आहे. महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या मराठवाडा विभागाच्या अध्यक्षा अंजली देशपांडे आणि बीड जिल्हा अध्यक्ष



ज्ञानेश्वर तिवारी यांच्या शिफारशीवरून महाराष्ट्र योग शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार,कार्यकारी अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी आणि आरोग्यवर्धिनी योग शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष गजानन चौधरी यांनी ही नियुक्ती केली आहे. राज्य कार्यकारिणी सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल गेवराई तालुका महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने ४ डिसें रोजी प्रा .राजेंद्र बरकसे यांचे पुष्पगुच्छ देऊन सर्व योग शिक्षकांनी अभिनंदन केले . राज्य आरोग्यवर्धिनी योग शिक्षक संघ हा महाराष्ट्रातील प्रत्येक आरोग्य केंद्रात असलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्र योगशिक्षक यांच्या नियुक्ती, संघटन व त्यांच्या समस्या - अडीअडचणी दूर करण्यासाठी सक्रिय काम करण्याच्या हेतूने ही नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने सर्व योगशिक्षक व आरोग्यवर्धिनी योगशिक्षक तथा महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष अरुण परदेशी, उपाध्यक्ष डॉ. अशोक येवले, सचिव सतीश पल्लेवाड , कोषाध्यक्ष अमित शिखरे, संयुक्त सचिव वैजनाथ मोरे, संघटन सचिव केशव पंडित, मिडिया प्रभारी नितीन कुलथे, सोशल मिडिया प्रभारी दीपक पुरी, कार्यालय सचिव प्रा .रामलिंग गुळवे, कार्यकारिणी सदस्य भीमजी पटेल, प्रा. सुरेश पाटील, शंकर सूर्यवंशी, प्रभाकर घोडके,डॉ. भगवान जाधव, शिवजी भुतडा, उत्तम सोलाणे, गिरी प्रकाश, साळुंखे दत्ता ,बळीराम यादव, सुरेश मानधणे, सावता नाईक, विष्णु शेलार, कल्याण हाकाळे ,अमोल कापसे, नवनाथ बोडखे, हरेष मंघारमाणी यांच्यासह अनेक पदाधिकारी व सदस्यांनी प्रा. बरकसे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत .



**बीड - महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमीत्त शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महात्मा फुले समता परिषद बीड च्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना ड. सुभाष राऊत राज्य अन्न आयोग अध्यक्ष महाराष्ट्र राज्य तथा प्रदेश उपाध्यक्ष समता परिषद. शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे, ज्ञानेश्वर राऊत, ऋषिकेश गनगे, मनोज वाघमारे आदीसह समता सैनिक उपस्थित होते.**

# एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी आवाहन

बीड ।प्रतिनिधी

इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित स्पर्धा परीक्षा होणार आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. सदर अर्ज २५ जानेवारी, २०२५ पर्यंत संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकांमार्फत सादर करावेत, असे आवाहन छत्रपती संभाजी नगरच्या आदिवासी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी केले आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद, कळमनुरी यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १२ जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व शासन मान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित, आदिम जमातीचे विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेसाठी पात्र राहातील. नमूद सर्व शाळेतील मुख्याध्यापक यांनी प्रवेश परीक्षेचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे मुदतीत सादर करावेत, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# यशवंत व्याख्यानमाला संयोजनसमितीच्या अध्यक्षपदी प्रा चत्रभुज गोडबोले , सचिवपदी आदित्य पवार

अंबड ।प्रतिनिधी

छत्रपती शिवरायांच्या जयंतीप्रित्यर्थ यशवंत प्रतिष्ठान, शेवगा ता अंबड जि. जालनाच्या वतीने आयोजित यशवंत व्याख्यानमाला फेब्रुवारी २०२५ संयोजनसमितीच्या अध्यक्षपदी प्रा चत्रभुज गोडबोले , सचिवपदी आदित्य पवार तर कार्याध्यक्षपदी रमेश वराडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आल्याचे यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री संजय खोरे यांनी सांगितले. मागील चौदा वर्षापासून अंबड शहरात शिवजयंतीच्या निमित्ताने यशवंत व्याख्यानमालेचे आयोजन यशवंत प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येते. मराठवाड्यातच् नव्हे तर महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या यशवंत व्याख्यानमालेत् महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील व्याख्यात्यांनी विविध विषयावर आपले विचार मांडलेले आहेत.

दरवर्षीप्रमाणे याहि वर्षी शिवजयंतीप्रित्यर्थ यशवंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते सुदाम मुकणे यांच्या अध्यक्षतेखाली स्वामी विवेकानंद वाचनालयात शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीत आगामी वर्षात यशवंत प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या यशवंत व्याख्यानमालेच्या संयोजन समितीची निवड करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

सर्वानुमते प्रा चत्रभुज गोडबोले यांची अध्यक्ष म्हणून



,आदित्य पवार यांची सचिवपदी , कार्याध्यक्षपदी रमेश वराडे यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणी मध्ये उपाध्यक्ष पत्रकार नाजीम सय्यद,विष्णू पुंड,रवी इंगळे तर सदस्य म्हणून डॉ गोपाल अडाणी,अल्ताफ शेख,डॉ मुरली जाधव,डॉ राहुल बागुल,राहुल साळवे,लक्ष्मण काळे, राजेश भापकर यांची निवड करण्यात आली.

सिद्धार्थ रोटे,ओमप्रकाश उबाळे,कुमार रूपवते,राजीव डोंगरे, जितेंद्र बुर्ले , गणेश वाडेकर,पत्रकार संतोष जिगे,पत्रकार अशोक डोरले,प्रा डॉ श्रीधर कापसे,जगदीश वाग्रुळकर, मुस्तकीम पटेल,प्राचार्य चंद्रशेखर जगताप हे मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. सदरील संयोजन समिती येणारी यशवंत व्याख्यानामाला आणि वर्षभरातील नियोजित कार्यक्रमाची अंमलबजावणी करणार आहेत.

यशवंत प्रतिष्ठानच्या यशवंत व्याख्यानमालेत येणाऱ्या दर्जेदार वक्त्यांची उज्वल परंपरा कायम ठेवून येणाऱ्या वर्षात अंबड शहर व परिसरातील श्रोत्यांना वैचारिक ,साहित्यिक व सांस्कृतिक मेजवानी देण्याचा आमचा प्रयत्न राहील असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्ष श्री चत्रभुज गोडबोले व सचिव आदित्य पवार यांनी व्यक्त केला.सदरील बैठकीस यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री संजय खोरे, स्वामी विवेकानंद वाचनालयाचे अध्यक्ष शिवाजी धुपे, सचिव राहुल साळवे यांची उपस्थित होती.

# सरपंच पुत्र व ग्रामसेवक यांनी अधिकारी यांना मॅनेज करून बनावट ग्रामसभा

## कागदपत्राचा बोगस कारभार

**वडवणी ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील सोन्नाखोटा येथील रहिवासी चंद्रकांत बळीराम लांडे यांची ग्रामरोजगार सहाय्यक या पदावर नियुक्ती दि. २६/०४/२०२४ रोजी तत्कालीन ग्रामसेवक व सरपंच यांनी माजी नियमानुसार निवड केलेली आहे. तेव्हापासून गावात जलसिंचन, विहिरीचे, रस्त्याचे, वृक्षलागवडीचे, गायगोठ्याचे कामे प्रमाणीकपणे करत आहे. सरपंच सौ.आशाबाई बिभीषण खोटे व ग्रामसेवक मोहित सुभाष ससाणे यांनी पंचायत समितीचे संबंधित अधिकारी यांना मॅनेज करून बनावट ग्रामसभा कागदपत्री बोगस दाखवून मला व ग्रामस्थांना कसल्याच प्रकारचे न कळविता शासन आदेशा विरुद्ध गैरवर्तन करत माझ्यावर अन्याय केला आहे.**

द्वितीय ग्राम रोजगार सहाय्यकांची आवश्यकता नसताना सरपंच यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून सरपंच पुत्र ऋषिकेश बिभीषण खोटे यांची पंचायत समितीचे अधिकारी यांना हाताशी धरून नियमबाह्य पणे द्वितीय ग्रामरोजगार सहाय्यकाची नेमणूक केली आहे. आलेल्या ग्रामसभेचे सर्व व्हिडिओ, चित्रीकरण, गलकॅम फोटो यांची तपासणी करण्यात यावी नियमबाह्य ग्रामसभा व नियमबाह्य द्वितीय ग्रामरोजगार सहाय्यक निवडीचा ठराव घेऊन दिशाभूल करणाऱ्या दोषी सरपंच ग्रामसेवक व वरिष्ठ अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी चंद्रकांत बळीराम लांडे यांनी निवेदनात केली आहे.

माझ्या विरुद्ध तक्रार नसतांना केवळ राजकीय द्वेष मनात धरुन रस्त्याचे बोगस मस्टर व दुतर्फा वृक्षलागवडीचे बोगस मस्टर काढत नव्हतो म्हणून केवळ बनावट ग्रामसभा दाखवुन गैरवर्तन केले आहे. ग्रामस्थांना व आम्हाला यांनी कसल्याही प्रकारचे कोठेही चर्चा न करता जाहीर प्रगटन न करता बनवाबनवी करत शासनाची व माझी दिशाभुल केली आहे. नियम बाह्य ग्रामसभा व नियम बाह्य द्वितीय ग्रामरोजगार सहाय्यक निवडीचा ठराव घेऊन दिशाभूल करणाऱ्या दोषी सरपंच ग्रामसेवक व वरिष्ठ अधिकारी यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करावी. व मला न्याय देण्यात यावा ही नम्र विनंती.

चंद्रकांत बळीराम लांडे
ग्रामरोजगार सहाय्यक
सोन्नाखोट्टा

# परतूर तालुक्यातील १२००, मंठा तालुक्यातील ८४० तर नेर सेवली सर्कल मधील १२० घरकुलांचा होणार समावेश

## रमाई आवास योजने करिता पात्र असलेला परतुर विधानसभा मतदारसंघातील कोणीही लाभार्थी सदरील योजनेपासून वंचित राहू नये – आमदार बबनराव लोणीकर

जालना ।प्रतिनिधी

ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या बेघर व्यक्तींना निवारा उपलब्ध व्हावा या हेतूने रमाई आवास योजना (ग्रामीण) ही महत्त्वकांक्षी योजना महाराष्ट्र राज्यभरात राज्य सरकार राबवत आहे. या योजनेच्या लाभापासून एकही लाभार्थी वंचित राहणार नाही यांची दक्षता म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतूर विधानसभा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी मंठा परतूर व तहसील कार्यालयात आढावा बैठकी घेऊन परतूर विधानसभा मतदार संघातील मंठा परतूर व जालना तालुक्यातील मंठा परतूर व जालना या तिन्ही पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांसह गावागावातील ग्रामसेवकांना सूचना देऊन आपापल्या गावातील प्रस्ताव



सादर करण्याचे आवाहन केले होते. या बाबतीत जिल्हाधिकारी जालना यांच्या जालनातही आढावा बैठक घेऊन संबंधित योजना जिल्हाभरात अतिशय प्रभावीपणे राबविण्याकरिता याबाबतचा शासनाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याचा आग्रह आमदार लोणीकर यांनी धरला होता. आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नाने रमाई आवास योजनेतल्या मंजूर उद्दिष्टांपैकी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे जालना तालुक्यातील नेर सेवली सर्कल मधील १२० मंठा तालुक्यातील ८४० तर परतूर तालुक्यातील १२०० रमाई आवास योजनेतील घरकुलाची मागणी करण्यात आली होती. झालेल्या सदर मागणीप्रमाणे उद्दिष्ट मंजूर करण्यात आली असल्याची माहिती. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यालयातून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात दिली आहे. रमाई आवास योजने करिता पात्र असलेला परतुर विधानसभा मतदारसंघातील कोणीही लाभार्थी सदरील योजनेपासून वंचित राहू नये. याकरिता गावागावातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वतः लक्ष घालून ग्रामसभा घेऊन पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याचे आवाहन देखील आमदार बबनराव लोणीकर

## जिल्ह्यातील बांधकाम कामगारांसाठी काम करणार्या

# संघटनाची १० डिसेंबर रोजी बैठक

बीड : जिल्ह्यातील बांधकाम कामगार,पेंटर इ.घटकासाठी काम करणार्या संघटनांची संयूक्त कृती समिती स्थापन करण्यासाठी मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी ११.०० वा.हमाल भवन, जुना मोंढा,बीड येथे सर्व संघटनाची बैठक कामगार कष्टकरी नेते राजकुमार घायाळ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली असल्याची माहिती असंघटीत मजदूर पंचायत चे अध्यक्ष शेरजमाखान पठाण यांनी दिली.

सदर बैठकीत संयूक्त कृती समिती स्थापन करण्यात येवून कामगारांच्या नोंदणी मध्ये झालेल्या गडबडीबाबत, कंत्राटदार मिस्त्रींच्या नियोक्ता परवाण्याबाबत, तसेच कामगार नोंदणी साठी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्राच्या अन्य पर्यायाबाबत, नैसर्गिक मृत्यूचा लाभाच्या वयाच्या अटी बाबत लाभाची प्रकरणे अनूक्रमानूसार निकाली काढण्या ऐवजी तांत्रिक हातचालाखी करुन काही प्रकरणे निकाली काढणे व उर्वरित प्रकरणे प्रलंबित ठेवणे व शैक्षणिक वर्ष संपल्यावर तांत्रिक व किरकोळ चुका दाखवून लाभ नाकारणे कामगार नोंदणी,नुतणीकरण,लाभाची प्रकरणे दाखल करण्याची प्रक्रिया नावालाच ऑनलाईन म्हणायचे व सर्व काम नियूक्त मोठया एजंट/ एजन्सी मार्फत व सब एजंट मार्फत करण्याचा निर्णय तात्काळ थांबवून कामगारांना त्यांचे मोबाईलवर स्वत: नोंदणी,नुतणीकरण करणे, लाभाचे प्रकरण दाखल करण्याची पद्धत पुर्ववत करावी या व इतर प्रश्नाबाबत संयुक्तपणे निर्णय घेवून कृती कार्यक्रम ठरवण्यात येणार आहे.तरी सदर बैठकीसाठी विविध संघटनांच्या पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन असंघटीत मजदूर पंचायतच्या वतीने बबन घुबरे,रामभाऊ बादाडे यांनी केले.

# युवा महोत्सवातून देशाचे भविष्य घडण्यास मदत- शिवकुमार स्वामी

## दोन दिवसीय युवा महोत्सवाचा समारोप

बीड ।प्रतिनिधी

बीडच्या युवकांमध्ये कलागुणांची खान आहे. बीड जिल्ह्यातील युवकांसाठी जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन समिती मार्फत युवा महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत चांगल्या प्रकारचे झालेले आहे. युवकांना अशा महोत्सवातून प्रोत्साहन मिळते. यातूनच देशाचे भविष्य घडण्यासही मदत होते, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, नेहरू युवा केंद्र यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय जिल्हास्तर युवा महोत्सव (ता. ०५) समारोपप्रसंगी ते बोलत होते. जेष्ठ क्रीडा संघटक तथा शिव छत्रपती पुरस्कारार्थी प्रा. जे. पी. शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा युवा अधिकारी अरूणा कोचुरे, उसतोड कामगार संघटनेचे अध्यक्ष उध्दव कराड, जेष्ठ क्रीडा व युवा संघटक प्रा. दिनकर थोरात, कलावंत तथा साने गुरूजी क. महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती डॉ. कविता कराड आदींची उपस्थिती होती.

सदर युवा महोत्सवात सहभागी होऊन प्राविण्य




मिळवणाऱ्या युवकांना विभागस्तर युवा महोत्सवासाठी शुभेच्छा देवून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांची राज्य व राष्ट्रयस्तरावरील युवा महोत्सवासाठी निवड व्हावी, अशी अपेक्षाही श्री. स्वामी यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यागर यांनी केले. सूत्रसंचालन पंडित चव्हाण केले. आभार श्रीमती कोचुरे यांनी मानले.

दिनांक ०५ डिसेंबर २०२४ रोजी कविता लेखन, कथालेखन, चित्रकला स्पर्धा, विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना या बाबींच्या स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक ०४ व ०५ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या स्पर्धात्मक बाबीमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या कलाकरांना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचे हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ट्रॉफी (चषक) देऊन गौरविण्यात आले.

जिल्हास्तर युवा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिष राठोड, रेवनाथ शेलार, अविनाश पाटील, क्रीडा विभागाचे धनेश करांडे, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, क्रीडा संयोजक जितेंद्र आराक, सचिन जाधव, किशोर काळे, मंगेश वडमारे आदींनी परीश्रम घेतले.

युवा महोत्सवा करिता परीक्षक म्हणून प्रा. डॉ. बी. टी. ताटे, प्रा. एस. के. परदेशी, प्रा. डॉ. संजय कांबळे, प्रा. डॉ पुनम ओहरी, प्रा. रोहीनी धारमोडे, सुमीत गायकवाड, वाघ राधाकृष्ण, लक्षीकांत दोडके, विलास सोनवने, प्रा. दिपक जमदाळे, प्रा. डॉ. संतोष मस्के, प्रदिप मांजरे, प्रा. डॉ. पांडुरंग सुतार, प्रा. राम गव्हाणे यांनी काम पाहीले.



# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

बीड ।प्रतिनिधी

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे सचिव प्रा.जे.पी. शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम.कदम एस.डी., प्राथमिकचे प्र.मुख्याध्यापक राऊत आर.टी, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीम. लोखंडे आर.डी. यांच्या हस्ते महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तसेच यावेळी शाळेतील सहशिक्षक श्री जगताप एस.सी म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे समतेचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाची राज्यघटना तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी खालच्या जातीतील किंवा अस्पृश्यांमधील भेदभाव बेकायदेशीर ठरवला आणि आपल्या देशवासियांमध्ये समानता प्रस्थापित करण्याचे महान कार्य केले असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# पार्थ पवार यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतली भेट

बीड (प्रतिनिधी)

मुंबई येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते पार्थ अजित पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट घेतली. पार्थ पवार यांनी बीड विधानसभा निवडणुकीबाबत चर्चा केली. तसेच, पक्षाच्या कामाची माहिती जाणून घेतली. यावेळी पार्थ पवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेवक रविंद्र कदम, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे उपस्थित होते.

# पाली येथे दोन दिवस खंडोबा यात्रा, जंगी कुस्त्याचे आयोजन

पाली ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे पाली येथे प्रति वर्ष प्रमाणे याही वर्षी खंडोबा यात्रा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने दिनांक ८ डिसेंबर २०२४ रविवार रोजी जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविक भक्तांनी विविध कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान पाली ग्रामस्थ व कमिटी च्या वतीने करण्यात आले आहे.

गेले अनेक वर्षापासून पाली येथे खंडोबाची यात्रा भरते, खंडोबाच्या दर्शनासाठी भाविक भक्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून व कर्नाटक राज्यातून भाविक आवर्जून येतात. खंडोबा मंदिर पुरातन मंदिर असून या मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी आहे. मंदिरासमोर दोन दिप माली आहेत. मंदिरा परिसरात एक कुंटल चा दगडी गोटी आहे दर्शनासाठी आलेले भाविक ही घोटी आपल्या खांद्यावर घेऊन मंदिरा प्रदक्षणा घालतात. मंदिराच्या दक्षिण दिशेला हेमाडपंथी श्री क्षेत्र नागनाथ मंदिर आहे. पश्चिमेला बिंदुसरा नदी आहे. उत्तर दिशेला हेमाडपंती दगडी बांधकाम शीला आहेत त्या ठिकाणी महादेवाची पिंड आहेत. दरवर्षी यात्रेसाठी भाविक प्रचंड गर्दी या ठिकाणी होते. दि.७ व आठ डिसेंबर या दिवशी यात्रा भरणार आहे दि.८ डिसेंबर २०२४ रविवार रोजी कुस्त्या चे आयोजन केले आहे तरी या दिवशी जास्तीत जास्त पैलवानांनी सहभाग नोंदवावा असे आव्हान पाली ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे यावर्षी देखील कुस्त्या फड रंगणार असून जास्तच जास्त भाविकांनी देखील याचा लाभ घ्यावा असे ग्रामस्थांच्या वतीनेआव्हान केले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# चिंचवण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने महाराणी ताराबाई विद्यालयामध्ये विविध उपक्रम घेऊन एड्स पंधरवडा साजरा

## शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे यांच्या हस्ते रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन

वडवणी ।प्रतिनिधी

जागतिक एड्स पंधरवाड्या निमित्त चिंचवण येथील ग्रामीण रुग्णालयाच्या आयसीटीसी विभागाच्या वतीने वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये इयत्ता- ९ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा व व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्याच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन करून शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले या प्रसंगी ग्रामीण रुग्णालय चिंचवण येथील आयसीटीसी विभागातील समुपदेशक श्री प्रसाद ठोसर तसेच विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के ए.आर.,लॅब टेक्निशियन श्रीमती बावरे मॅडम ,श्रीमती शोभाताई आंधळे,प्रा.उघडे मडम,प्रा.मुंडे सी.व्ही.,प्रा.संजय केदार उपस्थित होते. या रांगोळी स्पर्धेमध्ये कु.श्रद्धा गणेश माळवदे इयत्ता १२वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनीचा प्रथम क्रमांक आला तर द्वितीय क्रमांक कु.प्रेरणा महारुद्र केकाण १२वी विज्ञान



शाखेची विद्यार्थिनीचा तर इयत्ता- ९ वीची विद्यार्थिनी कु.भाग्यश्री पांडुरंग गायकवाड हिचा तृतीय क्रमांकाला तसेच विद्यार्थ्यांमध्ये एड्स संदर्भात जनजागृती करण्यासाठी मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष कार्यक्रम अधिकारी जिल्हा रुग्णालय बीड येथील डॉ.सुहास कुलकर्णी सर यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला त्यांनी विद्यार्थ्यांना एड्सच्या संदर्भात सखोल मार्गदर्शन व समुपदेशन केले त्यांच्यासोबत समुपदेशक प्रसाद ठोसर सर तसेच सुपरवायझर लिंक वर्कर वाल्मीक पाईक,लिंक वर्कर अश्विनीकुमार डावरे उपस्थित होते.व्याख्यानेच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक समुपदेशक प्रसाद ठोसर सर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.अंडील सर यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार उपपराचार्य मस्के सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते

# जिल्ह्यात उमेद अंतर्गत सात महिला शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना

## धन्य प्रतवारी मशीन व दाल मिल सुरू होणार

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा ग्रामीण यंत्रणा अंतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान व स्मार्ट अंतर्गत बीड जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या महिला शेतकरी उत्पादक कंपनीची आढावा बैठक प्रकल्प संचालिका संगितादेवी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गुरुवार दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या मार्फत सुरू असलेल्या व्यवसायाबाबत आढावा घेण्यात आला. तसेच उपस्थित सर्व अध्यक्ष सभासद यांना संगितादेवी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

बीड जिल्ह्यात एकूण ७ महिला शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. या शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत धान्य प्रतवारी मशीन व दाल मिल सुरू करण्यात येणार आहेत.अंबाजोगाई येथे उमेद सखी महिला शेतकरी उत्पादक कंपनी अंतर्गत ५३१ सदस्य, बीड तालुक्यात संघर्ष क्रांती महिला लिमिटेड अंतर्गत ५१०, पाटोदा तालुक्यात मराठवाडा महिला लिमिटेड अंतर्गत ३२०, माजलगाव मध्ये कृषी धनराज लक्ष्मी महिला शेतकरी उत्पादक कंपनी अंतर्गत ३६०, शिरूर कासार- कृषी रागिनी महिला लिमिटेड ५०० सदस्य, वडवणी- नारी कृषी महिला लिमिटेड अंतर्गत ३१२, तर गेवराई येथे कृषी त्वरिता महिला उत्पादक कंपनी अंतर्गत ५१० सदस्य या उत्पादक कंपनीमध्ये आहेत.

जिल्हा प्रकल्प संचालिका संगितादेवी पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा आढावा घेण्यात आला यावेळी श्रीमती पाटील यांनी संबंधित सर्व उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले कंपनी वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना यावेळी त्यांनी सांगितल्या. तालुका निहाय घेण्यात आलेल्या आढाव्यानंतर उपस्थित अध्यक्ष व सदस्यांनी आपले अनुभव कथन केले. बैठकीत जिल्हा अभियान व्यवस्थापक मुरहरी सावंत, जिल्हा व्यवस्थापक कुणाल मुंडे, शकील शेख, श्रीमती आशा पवार, तालुका अभियान व्यवस्थापक भारत पवार, अंबाजोगाई, रश्मी गोसावी, बीड, तात्यासाहेब लोंढे, माजलगाव, इरफान शेख गेवराई, अमोल काकड पाटोदा, श्रीकांत तोडवाड शिरूर, अनंत भोकरे वडवणी, प्रभाग समन्वयक बर्दापूर-संतोष माळी, प्रभाग समन्वयक बहिरवाडी- युवराज गारदे, प्रभाग समन्वयक तलवाडा- अमरनाथ गाभुड, प्रभाग समन्वयक पारगाव घुमरा- शकुंतला जावळे, पुष्पा नागरगोजे- मातोरी, विशाल बहिर- उपळी, यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# बेभान दिव्यांग मंत्रालयासह आयुक्तालयाच्या विरोधात

## नागपूर हिवाळी अधिवेशनावर झेंडा मोर्चा काढणार - डॉ जितेंद्र ओव्हाळ

बीड ।प्रतिनिधी

दिव्यांग मंत्रालयाच्या बेजबाबदार धोरणामुळे राज्यात हजारो दिव्यांग शाळा कर्मचारी तसेंच विध्यार्थी बरबाद झाले असा आरोप डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच राज्य अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी बीड येथून शुक्रवारी केलाया बाबतीत डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी सांगितले की राज्यात दिव्यांग शाळा दिव्यांग मुलांसाठी चालवल्या जात असल्याचा दिखावा दिव्यांग मंत्रालय त्याच बरोबर दिव्यांग आयुक्त कार्यालय पुणे करत आहे गेल्या वर्षी हिवाळीअधिवेशनावर आपण टमरेल मोर्चा काढला होता यात तत्कालीन सचिव महाजन उपसचिव घोडके यांनी मागण्या बाबतीत काहीच केले नाहीं याचा जाहीर निषेध करत आज परिस्थिती वेगळीच आहे विनाअनुदानित दिव्यांग शाळेना अनुदान नाहीं अनुदानित शाळा कर्मचाऱ्यांना वेतन नाहीं थकीत वेतन नाहीं मुबलक निधी नाहीं कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी नाहीं १२३ दिव्यांग शाळेना १००% अनुदान नाही या व दिव्यांग मंत्रालयाची कोणत्याही कामात हस्तेखोरी तसेंच दिव्यांग आयुक्त कार्यालयातील अनागोंधि कारभाराची व घोटाळेबाज अधिकाऱ्याची चौकशी करा या व अनेक मागण्यासाठी नागपूर हिवाळी अधिवेशनावर पहिल्याच दिवशी हजारो कार्यकर्त्यासह विराट झेंडा मोर्चा काढणार असल्याची माहिती डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिली

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त वकील संघाकडून भव्य रक्तदान शिबिर संपन्न




बीड ।प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त बीड जिल्हा वकील संघ व बीड ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने व बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड रोहिदास येवले यांच्या संकल्पनेतून दिनांक ६ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रभारी जिल्हा व सत्र न्यायाधीश सुरेखा पाटील यांच्या हस्ते सकाळी करण्यात आले.

सामाजिक जाण व गरजू रुग्णांना आवश्यक बाब म्हणून या शिबिरामध्ये वकील बांधवां भगिनी यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेऊन रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटना दरम्यान सुरुवातीला बीड जिल्हा वकील संघाच्या महिला प्रतिनिधी अँड छाया वाघमारे यांच्यासह अँड कपिल भैरट यांनी रक्तदानाला सुरुवात केली. यावेळी प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुरेखा पाटील वकील संघाचे अध्यक्ष अँड रोहिदास येवले उपाध्यक्ष अँड नितीन वाघमारे अँड अविनाश गडगे सचिव अँड यासेर पटेल अँड भीमा जगताप या पदाधिकाऱ्यासह अनेक बांधव भगिनी उपस्थित होत्या.हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी बीड शहरात नावाजलेले व सामाजिक बांधिलकी जपणारे बीड ब्लड सेंटर जालना रोड बीड यांच्या पदाधिकारी व सहकारी यांनी अथक व मेहनतपूर्वक परिश्रम घेऊन हे शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाची कार्य केले आहे. त्यात या ब्लड सेंटरचे अध्यक्ष अनिल बिराजदार यांच्यासह गोरक्षनाथ झिकरे धनंजय कांबळे अभिषेक देशमुख गायत्री चांदणे वैष्णवी गोटे यांनी विशेष परिश्रम घेऊन रक्तदान यशस्वी करण्यात मोलाची व सहकार्याची वृत्ती वकील संघाच्या या सदस्यांनी रक्तदान शिबिरात भाग घेऊन रक्तदान केले व सामाजिक बांधिलकी जोपासली. वकील संघाच्या महिला प्रतिनिधी अँड छाया वाघमारे अँड कपिल भैरट अँड विलास जोशी अँड कीर्ती जोशी माजी. महिला प्रतिनिधी अँड विद्या गायकवाड अँड शेख शहजाद अँड प्रशांत दगडखेरकर अँड सय्यद असद अँड शेख समीर अँड शिवाजी सपकाळ अँड शरद कोठवळे अँड एकनाथ काकडे अँड एम ए तांबोळी अँड आर के डावकर अँड ए बी वाघमारे अँड व्हीबी कदम अँड पी के दादमीया सोनवणे एस बी अँड एस एस सोनवणे अँड एस एस पाटील अँड एस एफ कादरी अँड अरविंद काळे अँड ए एस कुलकर्णी अँड समीर पाटोदकर त्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या सर्व रक्तदान करणाऱ्या विविध ज्ञान के वकील संघाचे अध्यक्ष अँड रोहिदास येवले व सचिव अँड यासेर पटेल यांनी आभार मानले.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन

बीड ।प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये भावपूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



यावप्रसंगी या विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, शिक्षक संतोष मेश्राम आणि उत्तम पवळ यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचे स्मरण भाषणातून केले. मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत उपेक्षित,मागास, वंचित समाजाला न्याय देण्याच्या कार्यरत राहून सर्वसामान्यांना सन्मार्ग दाखविला असे विचार प्रतिपादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले याप्रसंगी शिक्षक आर.बी. घुले, श्रीमती एन.जी. मुंडे, शिक्षकेतर कर्मचारी एस.एस. गायकवाड, डी.जी. हजारे, एल.बी.हजारे, आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही. खरसाडे , बहुसंख्य विद्यार्थी, पालक, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.




**मुंबई - येथे सागर निवासस्थानी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून त्यांना शुभेच्छा देतांना महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख अ‍ॅड.सतिष शिंदे व पदाधिकारी.**

# अपर जिल्हाधिकारी यांची कार्यवाही तर तहसीलदार घेतोय झोपेचे शोंग ..?

जालना ।प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यात अवैध वाळुंची वाहतूक होत असून याकडे महसूल प्रशासन अर्थपूर्ण दुर्लक्ष करीत आहे त्यामुळे वाळू माफीयांनी आपले डोके वर काढले आहे गेल्या दोन महिन्यापासून विधानसभा निवडणुक असल्यामुळे महसूलचे सर्वच अधिकारी निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याने चांगलाच उच्छाद मांडला होता आदर्श आचारसंहितेचा फायदा घेत वाळू तस्कर सक्रिय झाले होते. गोदावरी नदी पात्राची चाळणी करण्यास सुरुवात केली होती यामध्ये हजारो ब्रास वाळू वाहतूक करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे त्यामध्ये गेल्या अनेक दिवसापासून महसूल चे प्रशासन झोपेचे सोंग घेऊन**

आपले स्वतःचे आर्थिक हित संबंध जपून शासनाचा महसूल बुडवण्याच्या उद्देशाने स्वतःच्या फायद्यासाठी रात्रीची वाळू विक्रीची प्रक्रिया चालू करण्यात आली या प्रक्रियेत तुम्ही खुश और हम भी खुश बाकी सरकार के भरोसे सब बेहोश अशा पद्धतीने अंबड तहसील ने गेल्या दोन-तीन महिन्यापासून एकही कार्यवाही केली नसल्याचे दिसून येत आहे जी कार्यवाही पोलीस प्रशासनाने केली ती कार्यवाही आमची संयुक्त असल्याची सर्वत्र बोंबाबोंब करण्यात आली पोलीस प्रशासन आम्हाला सहकार्य करत नाही त्यामुळे आम्हाला कार्यवाही करण्यास अडथळा निर्माण होत आहे असे महसूल विभागाकडून बोलले जात आहे ? गेल्या महिन्यात महसूलच्या पथकाने डोमलगाव, आपेगाव या ठिकाणी काही वाळू जप्त केली होती परंतु ही वाळू वरिष्ठांना न सांगता परस्पर विक्री करण्यात आली होती त्यामुळे महसूल विभागात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे महसूल हे महसुलेच राहिले आहे असेही ऐकण्यात येत आहे. काही महिन्यापूर्वी जिल्ह्याचे गौण खनिज पथक यांनी अंबड तालुक्यात धडाकेबाज कारवाई करण्यात आली होती या कार्यवाहीत लाखोंचा मुद्देमाला जप्त केले होते तेव्हापासून अद्यापही कोणतेही कार्यवाही करण्यात आली नव्हती परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळालेल्या माहितीवरून अंबड तालुक्यात अवैध वाळू तस्करांचा बोभाटा चालू असून याकडे लक्ष द्यावे अशी देखील गावकऱ्यांनी मागणी केली होती त्याच पद्धतीने जालन्याच्या कर्तव्यदक्ष अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी आपले जिल्ह्याचे पथक घेऊन धुळे- बीड महामार्गावर थांबले असता अनेक वाळूने भरलेले हायवा जात असल्याचे दिसून आले परंतु त्या हायवांचा पाठलाग केला असता अधिकाऱ्यांना चकवा देऊन हयवा पळून गेले परंतु मागून येणारे हायवा अधिकाऱ्याला दिसताच त्यांनी थांबवले आणि संबंधित हायवा चालकांना वाहतूक संदर्भात आपल्याकडे काही परवाना आहे का असे विचारणा केला असता त्यांनी माझ्याकडे वाहतुकीस असे कोणतेही परवाने नाही असे सांगितले त्यामुळे संबंधित वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.वाळूने भरलेले भारत बेंज कंपनीचे विना नंबरचे एक टिप्पर ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन अंबड येथे लावण्यात आले आहे.अपर जिल्हाधिकारी यांची कार्यवाही तर तहसीलदार




घेतोय सोपेचे शोंग ..? असाही प्रश्न उपस्थित होत आहे . सदरची कार्यवाही मा.जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्णा पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रीता मेत्रेवार सह गौण खनिज पथक बालाजी पापुलवाड सहाय्यक महसूल अधिकारी संतोष खरात महसूल सहाय्यक शिवाजी कोल्हे सुरक्षारक्षक एडके साहेब मंडळ अधिकारी योगेश कुरेवाड अपर जिल्हाधिकारी यांचे वाहन चालक रामेश्वर मोहिते सदानंद गवई आधी पथकाने सदरील कारवाई केलेली आहे.

अंबड तहसीलचे पथक हप्ते गोळा करण्यासाठी आहे का ?

गेल्या अनेक दिवसापासून गोदावरी नदी पात्रातील अवैध वाळुंचे उत्खनन सुरू असून काही वाळूमाफ्यांचे हितसंबंध संबंधित अधिकाऱ्यांशी असून आणि अर्थपूर्ण मैत्री असून यामुळे कोणत्याही अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कार्यवाही करण्यास असमर्थ असून जप्त केलेले वाळू साठे देखील परस्पर विक्री करत असून कार्यवाहीच्या नावाखाली पन्नास ब्रास वाळू जप्त करून पाच ब्रास वाळू अंबड तहसील कार्यालयात आणून टाकले बाकीची वाळू परस्पर विक्री करून आपले खिसे भरण्याचे काम केले आहे. अंबड तहसीलचे पथक हे कारवाईच्या नावाखाली हप्ते वसुलीचे काम करत असल्याचे वाळू माफिया मधून ऐकण्यात येत आहे ? त्यामुळे अंबड तहसीलचे पथक फक्त गस्त घालण्याच्या हेतूने करताहेत हप्ते वसुली .?